**-: प्रेसनोट दिनांक- २१/०९/२०२१ :-**

शिवाजी दत्तात्रय चौगले, वय ४३, शिपाई - आंबेवाडी ग्रामपंचायत, ता. करवीर, जि. कोल्हापूर, रा. शिवनगर आंबेवाडी,ता.करवरी,जिल्हा कोल्हापुर यांनी लाच मागणी केलेबाबत....

---

कोल्हापूर जिल्ह्यात यावर्षी आलेल्या महापूरामुळे तकारदार यांचे हॉटेल परमीटरुम, बीयर बार मध्ये पावसाचे पाणी आल्याने हॉटेलचे मोठे नुकसान झाले. सदर हॉटेल परमीटरूम बीयर बार च्या महापुरामुळे झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्याकरीता हॉटेल व्यवसाय सुरु असलेबाबतचा सरपंचाच्या सहीचा ना-हरकत दाखला जोडणे आवश्यक असल्याचे महीती तक्रारदार यांना मिळाल्याने सदरचा सरपंचाच्या सहीचा नाहरकत दाखला मिळणेकरीता तक्रारदार यांनी आंबेवाडी ग्रामपंचायतीमध्ये जावून चौकशी केली त्या ठिकाणी उपस्थित शिपाई शिवाजी चौगले यांनी सदरचा दाखला देणेकरिता सरपंच श्रीं. मुजावर व माझे करिता ३,०००/-रुपये द्यावे लागतील तरच तुला दाखला मिळेल असे सांगुन ३०००/-रूपये लाचेची मागणी केली होती.सदर बाबत तक्रारदार यांनी दि.२४.०८.२०२१ रोजी अर्ज दिला होता.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे दोन पंच साक्षीदारांचे समक्ष दि. २४/०८/२०२१ रोजी आंबेवाडी गावामध्ये असले माने यांचे बिल्डीग मटेरियलचे दुकानासमोर आंबेवाडी ग्रामपंचयात कार्यालयाचे शिपाई शिवाजी चौगुले यांचे लाच मागणीबाबत पडताळणी केली असता, शिवाजी चौगले यांनी तक्रारदार यांचे हॉटेल परमीटरुम, बीयर बार हा व्यवसाय सुरू असलेबाबतचा सरपंचाच्या सहीचा ना-हरकत दाखला देणेकरीता तक्रारदार यांचेकडे रु. ३,०००/- लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

नमुद प्रकरणी तक्रारदार यांचे फिर्यादीवरून आरोपी लोकसेवक शिवाजी दत्तात्रय चौगले, वय ४३, शिपाई - आंबेवाडी ग्रामपंचायत, ता. करवीर, जि. कोल्हापूर, रा. शिवनगर आंबेवाडी,ता.करवरी,जिल्हा कोल्हापुर यांचेविरुध्द करवीर पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई मा.श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे ,मा.श्री सुरज गुरव अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे व मा.श्री सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, सतिश मोरे पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर, पोहेकॉ अजय चव्हण, पोना सुनिल घोसाळकर,पोना.कृष्णात पाटील व पोकॉ रूपेश माने, अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

१)मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२)मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३)श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३, कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. ५)व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.

Scanned by TapScanner